# जीवन सौंदर्याचा साक्षात्कार घडविणारे राजकवी तांबे

## व्यक्तिपरिचय

जीवन सौंदर्याचे रसिक पूजक कै. भास्करराव तांबे यांचे स्मारक महाराष्ट्र उभारीत आहे. त्यांच्या रसिक चाहत्यांनी प्रसृत केलेले निवेदन वाचले व 'मराठी काव्याला सूर देणाऱ्या' या पहिल्या 'भावसंगीतकारा'च्या अनेक काव्यपंक्ती मनसागरी तरंगू लागल्या.

'घन तमीं शुक्र बघ राज्य करी,  
रे खिन्न मना, बघ जरा तरी'

अनेकांच्या निराश मनात आशेचा अंकुर फुलविणाऱ्या त्या ओळीतील शब्द अंधाऱ्या रात्री लुकलुकणाऱ्या ''फूल हसे कांट्यांत बघ कसे,

काळ्या ढगिं बघ तेज रसरसे  
तीव्र हिमांतुनि वसंतहि हंसे  
रे, उघड नयन, कळ पळे दुरी'

आपले कौटुंबिक जीवन समाधानाने जगलेल्या या कवीच्या आशावादी मनांत उमटलेले हे भावतरंग. कै. तांबे यांचे सर्वच काव्य समाधान, आनंद व शांती यांनी भरलेले आहे. 'लोडाला टेकून लिहिलेले काव्य' असे वर्णन तांब्यांच्या कवितेचे केले जाते. त्यांच्या तृप्त जीवनाने घेतलेला हा शब्दाकार आहे. शृंगार हा त्यांच्या काव्याचा स्थायीभाव होता व प्रेम हा तर काव्याचा मुख्य विषय. परंतु दोन्हीकडे साफल्याच्या भावनेने कवीने पाहिल्यामुळे त्या नादमधुर शब्दब्रह्मांत इतकी उत्कटता आली की त्यामुळे 'रिकामे मधुघट' सदैव भरल्यासारखेच वाटले.

महाराष्ट्राबाहेर राहिलेल्या या कवीने एके काळी या भूमीला वेड लावले होते.


'डुमडुमत डमरू ये  
खणकणत शूल ये  
शंख फुंकीत ये  
येई रुद्रा!'

भारताच्या तेजस्वितेला आवाहन करणारी ही कविता कवीच्या प्रकृतीपेक्षा आगळी असूनही ओजस्वी भाषा व स्वातंत्र्याबद्दलची उत्फुल्ल भावना यामुळे सर्वांची मने तिने जिंकून घेतली होती.

कै. तांबे यांनी कविता लिहिल्या त्या स्वत:च्या समाधानासाठी. त्या कधी एका वहीत त्यांनी लिहून ठेवल्या नाहीत की कुणाकडे प्रकाशनाला त्यांनी पाठविल्या नाहीत. 'घरी लोळती जरो राज:कण' असेच या कवितांचे तांब्यांच्या घरी स्थान होते. ज्या मित्राला जी कविता आवडे ती तो घेऊन जाई. तांब्यांचे एक निकट मित्र कै. वासुदेव गोविंद आपटे यांनी स्वत:बरोबर आणलेल्या काही कविता पुण्याच्या मासिकांतून कवीला न सांगतां छापावयास सुरुवात केली तेव्हा महाराष्ट्राला तांबे यांचा परिचय झाला. ऑक्टोबर १८९८ च्या 'काव्यरत्नावलीं'त 'विधवेचें स्वप्न' ही कविता प्रथम प्रसिद्ध झाली व नंतर नोव्हेंबरमध्येच 'झरा' ही त्यांची दुसरी कविता प्रकाशित झाली.

ग्वाल्हेर संस्थानांतील मुगावली हे या कवीचे जन्मस्थान आणि देवास हे या कवीचे स्फूर्तिस्थान. कवी काळेले हा जन्मदिन २७ ऑक्टोबर १८७३ असा देतात. १८९३ मध्ये कविवर्य तांबे देवासच्या पाठशाळेत मास्तर झाले. नंतर देवासच्या राजपुत्राचे शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. या राजपुत्रासाठी 'चिव चिव चिमणी छतांत' हे बालगीत जन्मले व लहान मुलांच्या पुस्तकात त्याने आज कायमचे स्थान मिळविले आहे. देवासचा निसर्गरम्य परिसर, उज्जयिनीची क्षिप्रा, इंदूरचे खानदानी वातावरण, प्रतापगडची स्वस्थता यामुळे त्यांच्या काव्याने दरबारी बैठक घेतली व नंतर त्याला खरी मुलायम झालर लावली ती त्यांच्या पत्नीने.

१८९७ मध्ये त्यांचा विवाह झाला व 'डोळे हे जुल्मि गडे, रोखुनि मज पाहूं नका' असे भावपूर्ण काव्य विवाहापूर्वीच लिहिणाऱ्या या कवीच्या शब्दांना नवे पंख फुटले. 'स्पर्शे सखीच्या अमर जहालों, मला न तुमचा हेवा, यापासून 'सुफलित झाले गे सखि जीवित' असे कृतार्थ उद्गार तांबे यांनी काढून आपल्या समाधानी जीवनाची जणू पावती आपल्या पत्नीला दिली. गोविंदाग्रजांना प्रेमाचे शाहीर म्हटले जाते तसे तांबे यांनाही म्हटले पाहिजे, असे अनेक टीकाकार आज म्हणत आहेत. 'गुलाबी कोडें' सारखे 'कुणी कोडें माझें उकलिल का?' अशी समभावना



**'कौटुंबिक कवी' भास्करराव तांबे**  
**'सुफलित झाले गे सखी जीवित'**

व्यक्त करणारी कविता तांबे यांनी १९२० मध्ये लिहिली.

'हृदयिं तुझ्या सखि, दीप पाजळे  
प्रभा मुखावरि माझ्या उजळे;  
नवरत्नें तूं तुज भूषविलें,  
मन्मन खुललें आंतिक कां?  
गुलाब माझ्या हृदयीं फुलला,  
रंग तुझ्या गालांवर खुलला;  
कांटा माझ्या पायीं रुतला,  
शूल तुझ्या उरिं कोमल कां?'

सौंदर्याच्या या उपासकाला हा प्रेमाचा बहर पाहून कृतकृत्य झाल्यासारखे वाटले असावे. या प्रेमालाही त्यांनी सौंदर्याच्या कोंदणात बसविले. त्यामधून स्त्रीच्या मांगल्याचे उत्कट दर्शन त्यांना झाले व प्रेमगीते गाणारा हा कवी,

'भयचकित नमावें तुज रमणी  
जन कसे तुडविती तुज चरणीं'  
असे म्हणू लागला.

मध्य प्रदेशातील प्रतापगड मुक्कामी १९२० मध्ये त्यांनी ही कविता लिहिली. पोलीस प्रमुख व न्यायाधीशाच्या जागेवर ते तेथे त्या वेळी काम करीत होते. 'कौटुंबिक कवि' म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखत होता व कवीच्या प्रतिभेला अगदी नव्याने बहर आलेला होता. १९१० ते १९१७ या सात वर्षांत तांबे यांनी एकही कविता लिहिली नव्हती व १९२० या एका वर्षात त्यांनी ३३ कविता लिहिल्या. आणि याच वर्षी कवी वा. गो. मायदेव यांनी तांबे यांच्या इतस्तत: विखुरलेल्या कविता स्वत: हिंडून,

वृत्तपत्रांत जाहिराती देऊन मिळविल्या व त्यांचा हा पहिला संग्रह महाराष्ट्राला सादर केला. तांबे यांची स्मरणशक्तीही दांडगी होती. त्यांनी या प्रतापगड मुक्कामी ५० कविता सीतारामपंत देव यांना पाठ म्हणून लिहून घेतल्या. कवी मायदेव प्रतापगडपर्यंत जाऊन आले व सर्व कविता तांब्यांकडून त्यांनी तपासून घेतल्या. कवी मायदेवांनी हे परिश्रम घेतले नसते तर तांबे यांच्या कविता वाऱ्यावर उडून गेल्या असत्या. 'सरोवरें व कमळें' ही त्यांनी लिहिलेली प्रेम-गीतावली कधी मिळालीच नाही. पुण्याचे श्री. दि. ग. केळकर (कवि आज्ञातवासी) यांनी १९२७ मध्ये त्यांच्या कवितांचा दुसरा संग्रह प्रकाशित केला. १९३४ मध्ये कविवर्य तांबे यांची षष्ट्यब्दी अनेक ठिकाणी साजरी झाली व त्या निमित्ताने माधव ज्युलियन यांनी संपादित केलेला त्यांच्या समग्र कवितांचा संग्रह प्रकाशित झाला. चाहत्यांनी जगविलेले हे काव्य अशा तऱ्हेने संपूर्णपणे तांबे यांच्या हयातीतच जनतेसमोर आले. 'माझ्या कविता लोकांपुढे ठेवून कवी म्हणून मिरवावे असे कधी मला स्वप्नही पडले नाही' असे लिहिणाऱ्या या कवीला महाराष्ट्राने डोक्यावर घेतले. मायदेवांनी स्वत: गाऊन त्या कवितांची गेयता सर्वांच्या नजरेस आणून दिली. उत्कट भावनेचा गेय आविष्कार तांब्यांच्या कवितांइतका इतरत्र आढळणे कठीण होता. 'तें दूध तुझ्या घटांतलें', 'नववधू प्रिया मी बावरतें', 'घट तिचा रिकामा झऱ्यावरी' या भावगीतांच्या ओळी नभोवाणीवर रोज ऐकूनही अजून निर्जल झालेल्या नाहीत. त्यांच्यांतील तरल भावना कोमेजलेल्या नाहीत. १९३५ मध्ये ग्वाल्हेर नरेशांनी त्यांना 'राजकवी' बनविले व संस्थानी वातावरणात मोहरलेल्या त्यांच्या कविजीवनाची त्यात सांगता झाली.

निर्मळ मनाच्या या कवीला मृत्यूची चाहूल अजमेर मुक्कामी १९२१ सालीच लागली होती. जिवावरच्या दुखण्यातून ते तेव्हा बरे झाले होते. तांबे यांच्या काव्याचा रंगही या दुखण्यानंतर पालटला. परंतु हा कवी अखेर आपल्या मूळ प्रवृत्तीवर गेला व मरणांतही तो सौंदर्य शोधू लागला. 'महाप्रस्थान' या अभिधानाखाली त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या तेव्हा रसिकांना गूढगुंजनाचा भास होऊं लागला. परंतु कवी रा. अ. काळेले म्हणतात त्याप्रमाणे 'सौंदर्य मृगया हाच तांब्यांच्या काव्यांतील खरा गूढवाद ठरला.'

''रतलें परपुरुषाशीं रे,
मी रतलें परपुरुषाशीं
मधुर मुरलिसुर हलवुनि
भरभर ओढिती या चरणांशी''

हे चरण मृत्यचे आहेत. 'मला येथला लागला लळा, सासरी निघतां दाटतो गळा' असेही ते मृत्यूला सांगतात. आणि त्याचबरोबर,

'जन पळभर म्हणतील हाय हाय!
मी जातां राहील कार्य काय?'

अशी वास्तव भाषा कारून ते म्हणतात,

'सूर्य तळपतिल चंद्र झळकतिल;
तारे आपुला क्रम आचरतिल
असेच वारे पुढें वाहतील,
होईल कांहिं कां अंतराय'

परंतु याबद्दल कवीला खेद नाही. १९२१ च्या आजारानंतरच त्यांनी 'मरणांत खरोखर जग जगतें' ही अमर कविता लिहिली. मृत्यूचे तेव्हा घेतलेले ते उदात्त दर्शन त्यांनी शब्दरूप केले.

'अनंत मरणें आधीं मरावी
स्वातंत्र्याची आंस धरावी
मारिल मरणचि मरणाभावी
मग चिरंजीवपण यें बघ तें'

अखेरचे दिवस तांबे मुलाकडे ग्वाल्हेरी होते. १२ नोव्हेंबर १९४१ रोजीं तांब्यांनी आपली शेवटची कविता लिहिली. १९३५ पासूनच आपल्या कवितेचा बहर संपला हे त्यांना जाणवत होते व म्हणून पुण्याच्या रसिक संपादकाने कवितेची मागणी करताच दोन वर्षांपूर्वी लिहिलेली 'रिकामे मधुघट' ही कविता त्यांनी पाठविली.

''मधु मागशि माझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं''

असे आपले ह्रद्गत मोकळे करून कवीने निरवानिरवीची भाषा याच कवितेत केली.

'ढळला रे ढळला दिन सखया
संध्या छाया भिवविति ह्रदया,
आतां मधूचें नांव कासया?
लागले नेत्र रे पैलतिरीं?'

१९३३ पासून पैलतीरावर नजर लावून बसलेला हा समाधानी कवी तितक्याच शांतपणे ग्वाल्हेरी ७ डिसेंबर १९४१ रोजी अनंताच्या शोधात निघून गेला. त्यानंतर २० वर्षांनी मराठी रसिकांनी या कवीचे कायमचे स्मारक उभारण्याचा संकल्प सोडला. महाराष्ट्राबाहेर राहून मराठी सारस्वताची महती वाढविणाऱ्या या साहित्यसेवकाचे महाराष्ट्रावरचे ऋण फार मोठे आहे. आनंदाचे, आशेचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या या राजकवीचे स्मारक हे आमच्या रसिकतेचे प्रतीक आहे.

## पत्र प्रतिसाद

संपादक महोदय 'संपर्क' यांस
सप्रेम नमस्कार

'संपर्क'चा दसरा दिवाळी अंक अथ ते इति वाचून काढला. मला फार आवडला हे सांगणे नलगे.

अंकातील सर्व साहित्य दर्जेदार व सकस आहे. अग्निहोत्राबद्दलचा लेख सर्वोत्तम आहे. शास्त्रीय निकषांवर सिद्ध झालेला परिणाम मी मी म्हणणाऱ्यांनाही आश्चर्यचकित करेल. कोणासही हे थोतांड आहे किंवा अंधश्रद्धा आहे, असे म्हणून नाके मुरडता येणार नाही.

कै. श्री. शं. ना. नवरे या प्रतिथयश लेखकावरील लेख, शिवथर घळीची चक्षुर्वैसत्य माहिती वगैरे सर्व अंकाला एका साहित्यिक उंचीवर नेतात. त्यामुळे दीपावलीच्या या अक्षर फराळाबद्दल आभार मानावे तितके थोडेच.

सर्व ज्ञातिबांधवाना माझी एक सूचनावजा नम्र विनंती आहे, की त्यानी त्यांचेकडील उपयुक्त माहिती, फोटो, वगैरे संपादकांकडे महिनाभर आधीच द्यावी, म्हणजे त्यातील निवडक व योग्य तेवढे त्यांना अंकात समाविष्ट करता येईल. असो! अंकाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

आपला नम्र,
**य. वि. हर्डीकर**
(मो. ९३७३५९९०८४)